International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# विदर्भातील लेखिकांच्या कथांमधील विवाहसंस्थेविषयीचे स्वरूप व आकलन : उन्नती चौधरी

**Unnati**

Student, MGM, University

**सारांश** (Abstract )

भारतीय समाजात प्राचीन काळापासून वैवाहिक रूढी-परंपरा निश्चित केल्या गेले आहेत. येथील समाजव्यवस्था ही अनेक जाती,उपजातीनी बनलेली असली तरी त्या त्या जातीचे काही रीतिरिवाज सोडले तर हिंदू जीवनप्रणालीचा विवाहसंस्थेवर प्रभाव पडलेला दिसून येतो. विविध जाती समूहाच्या लोकांना आपापल्या सामाजिक रितीरिवाजानुसार कुटुंबातील मुला मुलींचे विवाह करणे सामाजिक दृष्ट्या बंधनकारक ठरविण्यात आलेले होते. समाजाच्या म्हणण्यानुसार कुटुंबाला तसे आचरण करूनच मुला मुलींना सामाजिक स्थान प्राप्त करून द्यायचे असते. म्हणून ते वैवाहिक रूढी परंपरेच्या विरोधात जात नाही. अलीकडे विवाहाच्या बाबतीत बरेच बदल घडून आले असले तरी,सामाजिक परंपरा व प्रथा मात्र अजूनही पाळल्या जातात. जातीबाहेर विवाह केले जात नाहीत.म्हणून तरुण तरुणी प्रेमविवाह करतात. तसेच लग्न न करता ते एकत्र राहण्याची एक ‘ लीव्ह अँड रिलेशनशिप’ अशी पद्धत प्रचलित होत गेलेली आहे. मात्र समाज त्याला मान्यता देऊ शकलेला नाही. अशा अनेक प्रकारची कथात्म मांडणी विदर्भातील लेखिकांनी त्यांच्या कथांमधून केलेली आहे. विशेषतः कुटुंब प्रमुख असलेला पुरुष मुलांच्या लग्नाचा निर्णय घेतो.त्याच्या विरुद्ध घरातील स्त्री काही बोलत नाही.त्यामुळे मुलींना तिच्या जगण्याचे व भविष्याचे स्वतः काहीच ठरविता येत नाही. वैवाहिक रूढी परंपरेनुसार मुलीला कनिष्ठ व दुय्यम स्थान दिले जात असल्याने तिच्या कुटुंबाला नमते घ्यावे लागते असेही या लेखिकांनी त्यांच्या कथांमधून स्पष्ट केलेले आहे.

**प्रस्तावना**

स्त्रीपुरुष यांच्यातील सातत्यपूर्ण लैंगिक संबंध आणि संतती प्राप्ती, यासाठी समाजाने मान्य केलेली विवाहसंस्था ही एक महत्वपूर्ण संस्था आहे. सामाजिक परंपरा, रूढी आणि विधीचे पालन करून विवाहबद्ध झाल्याशिवाय स्त्रीपुरुष यांचे नाते समाज मान्य होत नाही. प्रथम पती-पत्नी आणि त्यानंतर विविध नाते त्यांच्याशी जोडले जातात. लग्नानंतर पती-पत्नी म्हणून त्यांच्या सांसारिक जीवनाला सुरुवात होते.विवाहसंस्था ही केवळ प्रजनन गट निर्माण करण्यासाठी नसून पती आणि पत्नी या नात्याने स्त्रीपुरुषांच्या लैंगिक गरजा भागवणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असते. त्या नात्याशिवाय स्त्री आणि पुरुष यांना इतर कोणत्याही नात्याशी तसे संबंध ठेवणे समाज मान्य करत नाही. त्यावेळी अनाचार म्हणून तो विधीनिषेध मानला जातो. तसे होऊ नये म्हणून समाजातील युवा अवस्थेतील तरुण-तरुणींना लग्न करणे हे बंधनकारक ठरविले आहे. स्त्री आणि पुरुष हे दोन भिन्न गोतावळ्यातील, वेगवेगळ्या गोत्रातील असतात. स्त्रीकडील कुटुंब आणि त्यांचे नातेवाईक

तसेच पुरुषाकडील कुटुंब आणि त्याचे नातेवाईक, असे या दोघांच्या विवाहामुळे दोन्ही कुटुंबाच्या नातेसंबंधाचा एक मोठा परिवार निर्माण होतो,म्हणून विवाहसंस्था हा नातेसंबंधाचा प्राथमिक बिंदू ठरतो.या पार्श्वभूमीवर विदर्भातील कथालेखिकांनी वैवाहिक रूढी परंपरेविषयी प्रकट केलेले अनुभव व त्याचे स्वरूप याचे विश्लेषण येथे केलेले आहे.

**सुप्रिया अय्यर** यांच्या 'डाल्या डोळयाच गुपित' या कथेतील रूप्पल आणि अभिलाष हे भिन्न जातीचे असून कुटुंबाकडून लग्नाची परवानगी मागितल्याने त्या दोघांना ते देत नाही, म्हणून परस्पर नोंदणी विवाह करतात. एक खोली भाड्याने घेऊन राहतात. ते तिच्या आईला आवडत नाही. समाजाबाहेर जाऊन लग्न केल्यामुळे तिला शिकवल्याचा पश्चाताप करते. रूप्पलला सर्वांशी संघर्ष करावा लागतो. आई तिच्याकडे लक्ष ठेवून असते. तिला घराबाहेर जाऊ देत नाही. त्याच्याशी फोनवर बोलू देत नाही. तिची आई कोर्टाच मॅरेज सर्टिफिकेट फाडून फेकून देते. त्याच्या घरचे नातेवाईक त्याला तिच्याकडे जाऊन भेटू देत नाही. तिचे दुसर लग्न न करण्याचा निर्णय तिच्या आईला सांगते. तरीही तिची आई जातीतल्या मुलाशी लग्न करण्याचा आग्रह धरते.प्रेमविवाह आणि आंतरजातीय विवाह समाज मान्य करीत नाही. नातेवाईक नावे ठेवतात, म्हणून कुटुंब हे आपल्या तरुण मुलांच्या प्रेमविवाहास विरोध करताना दिसतात. 'किनखापी मोर' संग्रहातील 'निरभ्र' कथेतील मुलीचे लग्न ठरवताना घरातील जेष्ठ मंडळी निर्णय घेते.तसे अमृताच्या बाबतीतही घडते. प्रभाकरशी तिचं लग्न ठरविले जाते. दोघांचे वय व इतर गोष्टी अनुरूप असतात. परंपरेप्रमाणे लग्न होते. नंतर दुर्दैवाने पोटाची शस्त्रक्रिया करताना डॉक्टरच्या चुकीमुळे प्रभाकरचे निधन होते आणि अमृताला अकाली विधवापण येते. तेव्हा ती विवाहविषयक लोकसमजुतींचा विचार करते. 'हरवल्या दिशा' कथेतील नंदिनीची आत्या तिचं लग्न ठ़रवते. तिचे आईवडील होकार देतात. तिला आवडत नसूनही तीदेखील होकार देते. मात्र लग्नानंतर नवरा आळशी असल्याचे तिच्या लक्षात येते. ती त्याला बोलते, सांगते, पण त्याला काही फरक पडत नाही. त्याचे आईवडीलही त्याला काही बोलत नाही. तिचाही नाईलाज होतो.अर्थात लग्न जुळविताना कुटुंबातील जेष्ठ व्यक्ती अंतिम निर्णय घेतात.

**माधुरी आशिरगडे** यांच्या 'आई शपथ' कथेतील देवकी या तरूणीला गाण्याचा छंद असल्याने पंडित नावाच्या गायकाशी तिची मैत्री होते. दोघेही रुढी-परंपरेप्रमाणे लग्न करायचं ठरवतात. परंतु जावई गायक व तोही पंडित हे तिच्या वडिलांना मान्य नसते. म्हणून ते एक बिजवर असलेले स्थळ आणतात. पण देवकीला इतक्यात लग्न करायचं नसतं, तरीही तिचे वडिल तिचं लग्न ठरवतात. वंशाचा दिवा हवा म्हणून तो पहिल्या बायकोला सोडून देतो आणि देवकीशी लग्न करतो. तिलाही मुलगी होणार म्हणून तो तिला भरल्या दिवसाचीच घालवून देतो. पुन्हा मुलगा व्हावा म्हणून एका देवळात मोजक्यां लोकांसमोर तो तिसरं लग्न करतो.अर्थात पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत एकापेक्षा अधिक लग्न करण्याची परंपरा पुरूषाच्या वाट्याला आली असून ती समाजमान्य झालेली आहे. 'गुंता' या कथेतील भरत सुमतीशी प्रेमविवाह करतो, परंतु त्याची आई सुमातीचा द्वेष करते. मुलाने आपल्या पसंतीचे लग्न केले नाही म्हणून तिला तिचा राग येतो. पाच सहा वर्षानंतर भरतचा अपघात होऊन त्याचे निधन होते. त्याच्या जागेवर अनुकंपा म्हणून तिला नोकरी लागते. तिच्या कार्यालयातील तरुण सहकारी मित्र तिच्याशी लग्न करण्याची तयारी दर्शवतो, पण तिने लग्न केले तर आपण एकटे पडू, असे तिच्या सासूला वाटते, त्या एकाकीपणाच्या विचाराने तिचे मानसिक संतुलन बिघडते. सुमती पुन्हा लग्नाच्या तयारीत असताना तिला सासूच्या बाबतीत विचार करावा लागतो.

'मन वढायं वढायं' या कथेतील अपराला तिच्या इच्छेप्रमाणे शिक्षण घेऊ दिले जात नाही. ती बी.एस्सी. झाल्यानंतर घाईघाईत तिचे लग्न उरकून टाकलेले असते. चार सख्खी भावंडे, एक मोठा सावत्र भाऊ व बहिणी असलेल्या मानव नावाच्या एका प्राचार्याशी तिचे लग्न होते.मानव कर्तव्यभावनेने बहिणभावंडांचे शिक्षण करतो. त्यांचे लग्नही करून देतो. कुटुंबाची जबाबदारी पेलणाऱ्या मानवचे निधन होते आणि एकतीस वर्षाची असताना तिला वैधव्य येते. मानस हा तिच्या मोठ्या सावत्र नणदेचा मुलगा तिच्यापेक्षा आठ वर्षांनी लहान असतो. शिक्षणासाठी तो तिच्याकडेच राहतो. ऐन तारूण्यात अपराला आलेलं वैधव्य आणि तिचा तरूण सावत्र भाचा दोघही नकळतपणे, एकमेकांकडे आकर्षित होतात. मानसला लग्नाची स्थळे येतात, पण तो लग्न करण्यास तयार होत नाही. नंतर त्याचे कारण अपराला समजते. तो तिच्याशीच अर्थात सावत्र मामीशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त करतो, परंतु नाते आड येत असल्याने ती लग्नास तयार होत नाही. शेवटी मानसशी आपले लग्न होऊ शकणार नाही, याची जाणीव तिला असते, म्हणून वैधव्याच्या दहा अकरा वर्षानंतरचा कालावधी उलटूनही अपरा ह एका विधुराशी लग्न करायचे ठरवते.

'मनाची गुंथी' कथेतील वरिष्ठ महाविद्यालयातील नेने सरांना दोन मुलं व सुविद्य पत्नी असून त्यांचा चांगला संसार आहे. याशिवाय त्यांना राशी नावाची एक मैत्रीणदेखील आहे. त्यांच्या या संबंधाचे त्यांची विद्यार्थिनी राहीला फार कौतूक वाटते व त्यांच्याबद्दल आकर्षण वाटून त्यांच्यावर तिचा जीवही जडतो.सरांचा मुलगा निलय हा राहीच्या बरोबरीचा असून तो तिच्याशी लागट करून ती आवडते, असे सांगून तिच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवतो. त्याच्याशी लग्न करून सून म्हणून सरांसोबत राहता येईल, असा विचार करून ती लग्न करण्याचा निर्णय तिच्या वडिलांना सांगते. वडिल विरोध करतात, तेव्हा ती घर सोडून सरांकडे येते.एकूणच विवाहबद्ध झाल्याशिवाय स्त्री व पुरुष यांना परस्परांशी जवळीकतेचे नाते प्रस्थापित करता येत नाही आणि एकत्र राहून सहजीवन भोगता येत नाही,म्हणून तिचे लग्नाबाबतचे निर्णय लेखिकेने नेमकेपणे अधोरेखित केले आहे.

'उद्ध्वस्त' कथेतील शमिका ही तत्वज्ञानाची प्राध्यापिका असल्याने प्रत्येक कृती आणि विचारामागचे लॉजीक ती स्पष्ट करते. तिचा देवांगशी आंतरजातीय प्रेमविवाह असल्याने तिच्या सासरचे लोक तिला स्विकारत नाही. नंतर रेल्वे अपघातात देवांग मरण पावतो. वयाच्या पंचेचाळीशीत तिला विधवापण आल्याने एकटेपण जाणवते व ती अस्वस्थ राहते. अमृता हा पस्तीशीच्या आसपास व घटस्फोटीत असलेला तरूण एका कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर असतो. देवांगच्या कॅसेट्स पुन्हा रेकॉर्डिंग करण्याच्या निमित्ताने तिच्याकडे येत-जात राहतो. तिच्या मनात त्याच्या विषयी आकर्षण व आतुरता निर्माण होते. अमृतचे येणे हे आपल्याविषयीचे आकर्षण आहे, असे तिला वाटते. तिही त्याच्या विचारात गुंतून जाते. त्याच्या जवळीकतेसाठी आसुसते. तो घटस्फोटीत असल्याने आपल लग्न होऊ शकेल, या आशेवर ती असते. एकूणच एक विधवा स्त्री तिच्या शारीरिक-लैंगिक गरजा पूर्ण होण्यासाठी घटस्फोटीत पुरूषांशीदेखील लग्न करण्याच्या तयारीत दिसते, पण घटस्फोटीत पुरूषांना मात्र विधवा स्त्री नको असते, उपवर नवतरूणी हवी असते, अशी मांडणी या कथेत केलेली आहे. 'रक्त' कथेतील सौम्या ही गुजराती ब्राह्मण आणि कैफ हा मुस्लीम तरूण असून दोघेही प्रेमविवाह करण्याचे ठरवितात. मात्र तिच्या घरच्या लोकांचा त्यांच्या लग्नास विरोध असतो.अर्थात समाजाने ठरवून दिलेले विवाहविषयक

पारंपरिक संकेत पाळून तिचे कुटुंब सजातीयतेशी बांधिलकी पाळतात.त्यामुळे तिचा स्वप्नभंग होतो. विशेष म्हणजे भारतीय समाजात विवाह संस्थेने जातीजातीतच विवाह करण्याचे दंडक निर्माण केलेले असल्याने मुलीच्या बाबतीत तिचे कुटुंब त्याविषयीच्या परंपरा अधिक कटाक्षाने पाळते. याचबरोबर 'एक सत्य करपलेलं' कथेतील नटवर व प्रवृत्ती हे आंतरजातीय विवाह करतात. नटवरचे कुटुंब त्याबाबत नाराज असते.

**विशाखा कांबळे** यांच्या 'डिवोशन' कथेतील धीरज वर्षावर प्रेम असल्याचे सांगून लग्नाविषयी विचारतो. ती होकार-नकार देत नाही, पण त्याचा विचार करत राहते. त्याला कंपनीत नोकरी लागते. दोघंही प्रेम व लग्नाविषयी चर्चा करतात. तिचा मोठा भाऊ त्यांच्या लग्नाला नकार देतो.मोठी माणसे मुलींच्या भावना समजून घेत नाही. त्यांना अपेक्षित असे स्थळ ते शोधतात. त्यामुळे त्यांचा प्रेमभंग होतो आणि लग्न राहून जाते. 'स्ट्रगल' कथेतील दीपक विधवेच्या नवऱ्याचे उपकार म्हणून तिला विवाहाची मागणी घालतो. ती नकार देते व तिची सासूही विरोध करते,परंतु तिचे सासरे तिला समजून सांगतात.ती होकार देते,तरी तिच्या सासूचा विरोध असतो.विधवेशी लग्न करणे दिपकच्या आईला पटलेले नसते. ती छळ सुनेचा करते. अशाप्रकारे लग्न जुळण्याच्या बाबतीत समाजात ज्या काही गोष्टी रूढ झालेल्या आहेत,त्याशिवाय लग्न करणे,हे विवाहित दाम्पत्याला त्रासदायक ठरते, याची प्रचिती यातून येते.

'फिंगर प्रिन्ट' कथेत प्रतिष्ठीत श्रीमंत शेतकरी मनोहर भोसले, सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक तसेच अनेक सहकार क्षेत्रातील त्याचे कार्य महत्त्वपूर्ण कार्य असते. मनोहररावांच्या पत्नीचे निधन होते. मुलगा सुशांत महाविद्यालयात शिकत असतो. त्याचवर्षी उन्हाळ्यात मनोहरराव आपले लग्न करतो. घरात तरूण मुलं असताना, वडिलाने दुसरे लग्न करावे, ह्याचे खूप दुःख सुशांतला होते.कारण वडिलांनी तरुण मुलीशी विवाह केला. म्हणून दोघांत वाद होतात. 'गोंडी स्टेट' या कथेतील आदिवासी गोंड जमातीतील तरुण तरुणीच्या प्रेम विवाहस त्याचे वडील व तिची आई दोघेही तयार होतात. मात्र "तू गोंडाच्या घरात आपली पोरगी दिली तर, आम्ही तुमचं घर जातीबाहेर ठेवू!" असे म्हणून समाजातील लोक जातीभेद मानून विरोध करतात. म्हणजेच भारतातील जाती-जमाती कोणत्याही असल्या तरी, त्यांच्या विवाहाच्या रूढीपरंपरा ठरलेल्या आहेत. आपापल्या जातीत राहून लग्न करण्याचे दंडक असल्याने भिन्न जातीतील प्रियकर व प्रेयसीला त्यांच्या मर्जीने लग्न करता येत नाही,हे वास्तव यातून जाणवते.

**मोहना कारखानीस** यांच्या 'नाण्याची दुसरी बाजू' कथेतील सुशिला तिच्या महाविद्यालयातील देखण्या सुदेशशी प्रेमविवाह करण्याचे ठरविते. दोन्ही कुटुंबाकडून त्यांचा आंतरजातीय विवाह शेवटी पार पाडला जातो. याचबरोबर सुशिलेची मावसबहीण अनु ही सुंदर व मोकळया स्वभावाची व मित्र मैत्रिणमध्ये रमणारी असते. पारंपरिक रितीरिवाजानुसार तिचे लग्न अर्जुनशी ठरवून विधिपूर्वक पार पडते.

'व्हॅलेंटाईन डे' कथेतील ऋचा तरतरीत व हसतमुख असून महेशचे विचार व कष्टाळू, स्वभाव तिच्या आईवडिलांना आवडतो,म्हणून तिचे लग्न त्याच्याशी केले जाते. म्हणजेच मुलीला कमावता व सुस्वभावी मुलगा निवडून त्याच्याशी तिचे लग्न करणे, तिचा सुखी संसार असणे,याकडे आईवडील लक्ष देताना दिसून येतात. 'डाग चंद्रावरचा' कथेतील कोमलला एक स्थळ पाहायला येते.मुलगा व त्याचे आईवडील वधूपरीक्षेसाठी आले असताना परंपरेप्रमाणे मुलीला पाहण्याचे सोपस्कार होतात.मात्र तिला त्या मुलाशी लग्न करायचे नसते,तर तिच्या मित्राशी करायचे असते, म्हणून ती पाठीवर पांढरा डाग असल्याचे खोटेच सांगते,आलेले स्थळ परत जाते आणि तिचे लग्न तिच्या मित्राशी होते,अर्थातच लग्नाला

स्पष्टपणे नकार देण्यापेक्षा लोकसमजुतीचा फायदा घेऊन आपल्या आवडीप्रमाणे विवाहबद्ध होणारी तरुणी, विवाहाच्या वेळी समाजाचा मुलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि वधू संशोधन, याचे चित्रण लेखिकेने केलेले आहे.

'सामोरी' कथेतील वडिलांच्या नोकरीत कुटुंबाचा आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागत नाही, म्हणून मंजुश्रीचे वडील जे स्थळ आले त्यास होकार देत देऊन तिचे लग्न करतात. घरातील एका माणसाचा खर्च कमी होईल आणि समाजाची रीतभातही पाळली जाईल,अशा हेतूने कुटुंबप्रमुख मुलीच्या मनाचा आवडीनिवडीचा विचार करीत नाही,असे यातून प्रकट होते. 'आहेर' कथेतील आईला मुलीचे लग्न ठरल्याचा खूप आनंद होतो. रूढी-परंपरेप्रमाणे अनघा तिच्या मुलीच्या विवाहाची सर्व तयारी करते. वराकडील मंडळी मुंबईहून रेल्वेने येतात. एका हॉटेलमध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था करतात. अनघा व तिचा पती अरूण पाहुणे मंडळींना भेटवस्तू घेऊन येतात.अशी मांडणी या कथेत केलेली आहे.

**कुमुद मंडलेकर** त्यांच्या 'बळ' या कथेतील नायिकेची आजी आणि आई यांचे बालविवाह झाल्याची माहिती ती सांगते. स्त्री म्हणजे 'चूल आणि मूल' ही समाजाची मानसिकता लक्षात आणून देते.अर्थात पितृसत्ताक कुटुंबात लग्नाच्या बाबतीत मुलीला स्वतंत्रपणे निर्णय घेता येत नाही.आईवडील त्यातल्या त्यात वडील जे ठरवतील त्याप्रमाणे तिने लग्नासाठी तयार राहावे, अशी प्रचलित विवाहसंस्थेची चौकट यातून प्रकट होते.

'अंजनीची माय' या कथेत नोकरी करणाऱ्या अंजलीचे वडील निवृत्तीवेतनधारक असतात. त्यात त्यांच्या कुटुंबाचा खर्च भागत नाही, म्हणून मुलीचे लग्न जितक्या उशिरा होईल तितका कुटुंबाला हातभार लागेल, या विचाराने ते तिच्या लग्नाची टाळाटाळ करतात. 'तवंग' या कथेत मुलीच्या वडिलांना हुंडा दिला जातो, म्हणून तिचे वडील तिच्या आवडीनिवडी विचारता न घेता तिच्या लग्नाची घाई करतात.कारण आईवडीलही लिंगभेद करून मुलीला दुय्यम वागणूक देतात आणि तिच्या लग्नाचे पैसे मिळवण्यासाठी ती पंधरावर्षाची असताना अल्पावयात तिचे लग्न ठरवतात. 'देहकिनारा' संग्रहातील 'कौल' या कथेत 'आतेघरी सून', अशी परंपरा दिसून येते.शिकलेल्या व हुशार रूबिनाचे लहानपणी तिच्या आत्याच्या मुलाशी लग्न ठरते. तिची आई त्या लग्नास विरोध करते. रूबिनाचे वडील तिच्या आवडीनिवडीचा विचार करीत नाही. तिला आवडणाऱ्या मुलाशी नसीमशी तिचं लग्न व्हावं असं तिला वाटतं, पण तसं वडिलांना सांगण्याची हिंमत होत नाही. बाप संतापी, घरातील मोठी माणसंही बुवा, बहीण, भाऊही तसेच अर्थात मुलीच्या मनाचा विचारच केला जात नाही.'क्लिअरन्स' कथेतील नैना दिसायला चांगली, पण उंची कमी असल्याने तिला लग्नासाठी आलेले स्थळे नकार देतात. तिच्या वडिलांना तिच्या लग्नाची चिंता वाटते,पण विवाह पद्धतीने वरपक्षाल श्रेष्ठ स्थान दिल्याने आणि मुलगा त्याचे कुटुंब यांच्या आवडीनिवडीला प्राधान्य असल्याने मुलीच्या पसंतीचा प्रश्न निर्माण होतो.'लक्ष' कथेत वैवाहिक रूढी-परंपरेमुळे मुलीच्या आईवडिलांना पैशाची चिंता वाटते, अर्थात विवाहसंस्थेत मुलगी आणि तिचे माहेरची माणसे यांना कनिष्ठ व दुय्यम स्थान दिलेले दिसून येते. मुलगा व वरपक्ष यांच्या मानपानाच्या परंपरा वधूपक्षाला कटाक्षाने पाळाव्या लागतात.नाहीतर मुलीला वैवाहिक जीवनात फार त्रास दिला जातो.

मुलीला कुटुंबातील तिचे बालपण चांगले वाटते.तर लग्न हेच तिच्या अनंत अडचणीचे कारण ठरते. अशी मांडणी 'प्रवाहापलिकडचं' या कथेत केली आहे. रूढी परंपरेप्रमाणे लग्न होण्यापेक्षा एकमेकांना समजून घेऊन त्यांच्या मानसिक, भावनिक आणि आरोग्यविषक तपासण्या करणे अधिक चांगलं, असा विचारही लेखिका स्त्रीजीवनाच्या संदर्भात मांडतात. 'पडताळा' कथेतील राधिका बारावीला मेरिटमध्ये आल्यानंतर मेडीकलला प्रवेश घेते. त्यासाठी आईचे दागिने विकावे

लागतात. तिचे वडील सावकाराकडे दिवाणजी म्हणून काम करतात, पगार कमी असल्याने घरी गरिबी असते.पाच-सहा मुलांचे शिक्षण करता येत नाही. ती तिचे सर्व शिक्षण सरकारी शिष्यवृत्तीवर करते. जिद्दीन शिक्षण पूर्ण करून सरकारी दवाखान्यात लेडीडॉक्टर म्हणून नोकरीला लागते. तिला नात्यातील मुलाचं स्थळ येते. तिची इच्छा नसताना ती कमी शिकलेल्या तरूणाशी लग्न करते.

पडसाद संग्रहातील 'बहाणा' कथेतील मोना लहान असताना तिच्या आईचे निधन होते. नंतर तिचे वडील तिचे खूप प्रेमाने संगोपन करतात. ती एम.एससीपर्यंत शिक्षण घेते, परंतु दुर्दैवाने तिच्या वडिलांचे निधन होते. त्यानंतर तिचे काकाकाकू तिचं लग्न ठरवतात. तिच्या होणाऱ्या सासऱ्याची तार येते आणि लग्न रद्द होते. लग्नासाठी आसुसलेला रमेश व त्याचा स्वीकार करणारी मोना दोघांचेही स्वप्नभंग होते. 'पाचर कथेतील शालू मुलीच्या लग्नाच्या विचाराने चिंताग्रस्त असते. तिला झोप लागत नाही. लग्नासाठी मुलाकडून होकार येतो.तिच्या मनात सारखा मुलीच्या लग्नाचा विचार येतो. मुलगी पसंद पडल्यामुले वरकडील मंडळीने काही मागितले तर या विचाराने तिला ताण येतो.

'प्रत्यय' संग्रहातील 'वासे घराचे' कथेतील शिक्षित सुंदर तरुणी स्वतःच्या लग्नाबाबत अपेक्षित जोडीदार मिळण्याच्या फार मोठ्या अपेक्षा बाळगून असल्याने तिचे वय वाढत जाते आणि योग्य स्थळ मिळत नाही, म्हणून ती मनाने खचून जात असते, अशी मांडणी केलेली आहे. 'नातं' कथेतील आईवडील मुलीच्या लग्नासाठी स्थळ शोधतात. मुलीच्या पसंतीचा विचार केला जात नाही. देखण्या, रूबाबदार, इंजिनियर असलेल्या विवेकशी तिचं लग्न होतं. पहिल्या रात्री तो उशिरा घरी येतो. दारू आणि सिगारेटचा तिला वास येतो. पहिल्याच दिवशी रात्री दोघांच्यामध्ये वाद होतो. ती त्याच्याजवळ जाते तर तो तिला दूर करतो.त्यावेळी त्यांच्यात वादविवाद होतो.कारण वैवाहिक रूढी परंपरेमुळे मुलगा आणि मुलगी यांच्या आवडीनिवडीचा विचार न करता आईवडील त्यांचे लग्न लावून देतात. त्यामुळे विवेकला त्याच्या इच्छेप्रमाणे दोन मुलांच्या आईशी प्रेमविवाह करता येत नाही आणि सीमाला नवऱ्याचा सहवास मिळत नाही.

**मोहना मार्डीकर** यांच्या 'बदल' या कथेत अनंता व सुमित्रा दोघे प्रेमविवाह करतात. वयोमाना - नुसार तिच्या ठिकाणी मेनोपॉज आल्याने दोघा पती-पत्नीमध्ये काम जीवनाच्या संदर्भात अंतर पडत गेल्याची भावना तिच्या ठिकाणी निर्माण होते."नुसता शरीरसंबंध म्हणजे लग्न नव्हे तर एकमेकांचं सुखदुःख वाटून घेण्याची शपथ आपण विवाहवेदीवर घेत असतो." अशी समजूत तो घालतो. 'मी माझीच' या कथेतील नायिका लग्नाच्या बाबतीत स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने विचार करते. तिचे आईवडील, भाऊ व बहिणी तिला समजून घेतात, तिचे आईवडील लग्नाचा विषय तिच्याकडे काढतात. मात्र 'लग्न म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता नसून एक चूक झाली ती पुन्हा करायची नाही, लग्न बंधनात न अडकता समाजकार्य करायचे' अशी ती सांगते. तिची आई तिला समजवते की, "बिनलग्नाची एकटी-दुकटी मुलगी पाहिली की तोच समाज तिच्याकडे वेगळया नजरेने पाहतो, तुला कल्पना नाही. समाजातल्या दुष्ट प्रवृत्ती टपलेल्या असतात तिच्यावर" तरीही तिची लग्न करण्याची इच्छाच नसते.

'चौकट' या कथेतील दर्शना एम.ए. नंतर कॉलेजला प्राध्यापिक म्हणून नोकरीला लागते. पीएच.डी. करते. वयाची पंचवीस वर्षे होऊन जातात. आईवडिलांना तिच्या लग्नाची चिंता वाटते. तिला ते समजून सांगतात, पण कोणावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतंत्र आयुष्य जगण्याचा विचार ती करते. लग्न, संसार, मुलंबाळं ही बंदिस्त चौकट तिला नको वाटते. त्या चौकटीबाहेर राहून ती जीवनाचा आनंद शोधते. इतरांसारख्या नैसर्गिक मुलभूत जाणिवा ती जोपासते. कुठल्याही अनुभवाला ती बेधडक भिडते. मात्र मातृत्वाच्या कल्पनेने लग्न करण्याची इच्छा तिच्या मनात निर्माण होते. 'देवकी' या

कथेतील एका मुलाची विधवा आई असलेली रेवती पुनर्विवाहाच्या बाबतीत विचार करताना मुलाच्या संगोपनाचा प्रश्न तिला पडतो. तिचा मुलगा दिराला दत्तक देते आणि अमेरिकेतील इंजिनिअर असलेल्या तरूणीशी लग्न करते.

'कशी करू स्वागत!' या कथेत लेखिका स्त्री-पुरूष सहजीवनात लग्नाचे फार महत्व सांगतात. स्त्री व पुरुष यांना सहजीवनासाठी एकत्र राहणे त्यांच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक असते आणि त्यासाठी समाजाने लग्न ,म्हणजेच विवाहसंस्था निर्माण करून तिला अबाधित ठेवलेले आहे.म्हणून प्रत्येकाला लग्नाचा विचार करावाच लागतो, मात्र आजची तरुण पिढी ते मानत नाही. 'लग्न हे सामाजिक बंधन व मुलबाळं म्हणजे कष्ट करायला लावरणारा रूक्ष संसार', असं म्हणून कथेतील तरुण लग्न न करता स्वच्छंद, निर्बंध जीवन जगण्याची भाषा बोलतो. ठामपणे लग्नाच्या विरोधात राहतो.म्हणून त्याची मैत्रीण त्याला सोडून आईकडे येते. म्हणजेच लग्नाशिवाय स्त्रीपुरुष यांना एकत्र राहता येत नाही आणि मुलाला जन्मही देता येत नाही, अशी मांडणी लेखिकेने केलेली आहे.

**सुमती वानखेडे** यांच्या 'सल' कथेतील संकेतला समीक्षा नावाची तरुणी लेखिका म्हणून फार आवडते. तो तिच्या प्रेमात पडतो आणि तिला आग्रह करून तिच्याशी लग्नही करतो. 'खिडकी' कथेतील कौशकची आई लहानपणीच मरण पावलेली असते. नंतर बँकेत कारकुनी करणारे त्याचे वडिल पक्षघाताने मरण पावतात. त्याच्या वडिलांच्या बँकेतील मॅनेजर कौशिकचा असहाय्यतेचा फायदा घेतो व त्याच्या बहिणीच्या पतीला बँकेत नोकरीला लावण्याचे आश्वासन देतो. त्याबदल्यात तो मॅनेजर लहानपणी अतिप्रसंगाला बळी पडलेल्या आणि वेड्याचे झटके येत असलेल्या स्वतःच्या मुलीचे त्याच्याशी लग्न लावून देतो. 'वेध' कथेतील सारजाचं आणि गणाचं एकमेकांवर प्रेम असते. सारजा त्याला लग्न करण्यासंबंधी विचारत असते. तर तो त्याच्या एका बहिणीचे लग्न आणि दुसरीचे बाळंतपण याचे कारण सांगून टाळतो. लोकांमध्ये चर्चा होण्याआधीच लग्न व्हावं असं तिला वाटतं,परंतु दारिद्र्यामुळे तिला व तिच्या वाडिलांना सावकाराचे ऐकावे लागते.शेवटी सावकाराने आणलेल्या एका स्थळाशी तिच लग्न ठरवून टाकतो. स्त्रीच्या मनाचा, भावनांचा, आवडीनिवडींचा, इच्छा आकांक्षाचा विचार न करता कुटुंबप्रमुख तिच्या लग्नाचे निर्णय घेतात. मग आलेले स्थळ कसेही असले तरी त्यास निमूटपणे तिला स्विकारण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो, असे यातून दिसून येते.

'त्या दोघी' या कथेत वैवाहिक रूढीपरंपरेमुळे स्त्रित्वाला पडणाऱ्या अनेक मर्यादांचे आणि बंधनाचे चित्रण लेखिकेने केलेले आहे."लग्न म्हणजे व्यवहार असतो; पण प्रेम व्यवहारी नसतं, खऱ्या प्रेमाला व्यवहाराच्या नियमबद्ध चौकटीत कधी बसवताच येत नाही, आपलं आत्मिक मनोबल, धैर्य वाढवण्यासाठीच अशा खऱ्या, पवित्र प्रेमाची आपल्याला नितांत गरज असते. पण नेमकं तेच आपल्याला मिळत नाही. चुकून मिळालंच तर.....सोसवत नाही, अशातली आपली गत. समाजातल्या गिधाडांच्या नजरा सातत्यानं आपल्यावर रोखलेल्या असतात. घटस्फोटीत, निराधार स्त्रियांबद्दलची समाजाची मानसिकता अजूनही बदलत नाही " असे निवेदन लेखिकेने केले आहे. आणि समाज काय म्हणेल,ही भीती स्त्रियांना वाटत असली तरी आत्मविश्वासाने आपलं अस्तित्व टिकून ठेवावं आणि जगावं, अशा विचाराची नायिका या कथेतून साकार केलेली आहे.

**अरूणा सबाने** यांच्या 'बाईजी' कथेतील नायिकेचा नवरा दुसरे लग्न करण्याच्या तयारीत असतो. त्याला तिची दयाही येत नाही. तो तिला घराबाहेर काढतो. कोणालाच तिची किव येत नाही. चार महिन्याच्या मुलीला घेऊन ती घराबाहेर पडते.

वडिलांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचू नये आणि पाठीमागच्या दोन लहान बहिणीच्या लग्नात विघ्न येऊ नये म्हणून ती माहेरी जाण्याचे टाळते आणि सासरीही परत जायचे नाही, असा निर्धार करते. संजू नावाचा पदवीधर असलेला हमाल एकटाच राहत असतो. तो तिला त्याच्याघरी आश्रय देतो. काही काळाने ते दोघेही लग्न करतात. 'न तुटलेली नाळ' कथेतील शशांक व रमा यांचे एकमेकांवर प्रेम असते, दोघेही प्रेमविवाह करायचे ठरवतात, परंतु तिच्या कुटुंबाचा त्यास विरोध असतो. तिचे लग्न दुसरीकडेच ठरतं. त्यामुळे ती शशांकला आपल्यातील सर्व प्रेम विसरून जायला सांगते. त्याचा प्रेमभंग होतो. तो उदास होऊन एकाकी राहतो, दारूच्या आहारी जातो. आत्महत्या करतो.

**सीमा साखरे** यांच्या 'चार भिंतीच्या आत' कथेतील पन्नाशीतील गुलाबराव वाड्याला वारस पाहिजे, म्हणून वीस वर्षाच्या सरस्वतीशी लग्न करतो.ते त्याचे तिसरे लग्न असते. 'झोपाळा' या कथेतील भाऊ खानदेशातील मुलगी पसंत करतो. त्याची आई सामाजिक कार्यकर्त्या, कडक शिस्तीची असते. भाऊचं परस्पर मुलगी पाहणं त्यांना आवडत नाही. " तू एकट्याने कसी काय मुलगी पसंत केली? आम्ही मुलगी, तिचे घराणे काही पाहिले नाही. केवळ मुलाने मुलगी पसंत करण्याची आमच्या घराण्याची रीत नाही." असे त्याची आई बोलते.शेवटी भाऊचे सासरे गरीब असले तरी त्याच्या आग्रहामुळे तिच्याशी लग्न होते. म्हणजेच विवाह जुळणीच्या वेळेला मुलगा मुलीच्या सौंदर्याला व देखणेपणाला अधिक महत्त्व देतो. 'इज्जत' या कथेतील मिनूचे आईवडील वेगळे राहतात. मिनू आईकडे राहते. तिची आई तिचे संगोपन करते. मोठी झाल्यानंतर लग्नही जुळवते, परंतु तिचे वडील त्या लग्नामध्ये वाद निर्माण करतात. कन्यादानाला विरोध करतात.मंत्र म्हणणाऱ्या पुरोहिताला "मी कन्यादान करणार नाही, ते माझ्या तत्वात बसत नाही." असे पुरोहितला सांगतात,पण "त्याशिवाय विवाहविधी पूर्ण होत नाही." असे पुरोहित सांगतो.शेवटी तो सन्मानपूर्वक हसत हसत विजोयन्मादात कन्यादान करतो.

'शह-काटशह' या कथेतील लिना व हेमंत या दोघांची शाळेपासून ओळख असते. ते एकमेकांवर प्रेमही करतात. नंतर एकाच विभागात प्राध्यापक असतात. दोघेही लग्न करण्याचा निर्णय घेतात, पण मास्तरची मुलगी म्हणून त्याच्या आईला ती पसंत नसते. शिवाय त्याच्या घरात सर्व गोरे व ती सावळी, तरी त्याचे वडील दोघांचे लग्न उरकून टाकतात.'छत मिळाल पण आकाश हरवलं' नायिकेचे मेहुणे व बहिणी तिच्या लग्नाचा आग्रह तिला करतात. मेहुणे स्थळ सुचवतात. तिच्याही मनात एकीकडे लग्न, जोडीदार, मूलबाळ, घर असे चित्र तयार होते. तर दुसरीकडे तिचं निसर्गाचं वेड, तिचे छंद, काव्य, कलाविश्व हेच तिला छान वाटतं. शेवटी ती मिलिटरीतून निवृत्त होऊन व्यवसाय करणाऱ्या तिच्या बहिणीच्या दिराच्या मित्राशी लग्न करते.

'उशिरा सुचलेलं शहाणपण' या कथेतील महेश हा अंजलीला मंदिरात नेऊन हार घालून लग्न केल्याचे नाटक करून सावधगिरीनं वागतो. लग्नाची नोंदणी करत नाही तिला सतरा वर्षे बायको म्हणून वापरतो. चार भितींच्या आत आपल्याबरोबर राहत आहे. पण तो आपला नाही याची जाणिव तिला होते आणि आयुष्याचं गणित चुकल्यासारखं वाटतं. त्याने फसवल्याची जाणीव झाल्यानंतर ती त्याला शिव्या देते.अर्थातच लग्नाशिवाय पुरुषासोबत स्त्रीने राहणे समाजाला मान्य नसते म्हणून अंजली विवाहाचा आग्रह धरते. कारण विवाहसंस्था ही समाजमान्य असल्याने लग्नाशिवाय समाज हा स्त्रीपुरूषांच्या नात्याला मान्यता देत नाही. 'त्यादोघी' कथेतील राधाची व मिराची मैत्री दृढ होते. मीराची आई

नंदकुमारशी तिचं लग्न व्हावे म्हणून मागणी करून ठेवते. आईला कॅन्सर असल्याने लग्नाला सहमती व इच्छा नसताना आईसाठी मिरा ही त्या मागणीला मंजुरी देते. राधा आक्रमक होते; पण आई व भावाच्या दबावामुळे नंदूशी तिचे लग्न होते.

**मनिषा साधू** यांच्या 'वाट शहराची' या कथेतील तरुणाला शहरात उच्च शिक्षण घ्यायचे असते,परंतु अमरावतीला उच्च शिक्षणासाठी जाण्याआधीच त्याचे लग्न ठरवण्यासाठी त्याला मंजुषाच्या घरी वधु परिक्षेला त्याचा बाप घेऊन जातो. त्याच्या बापाने तिच्या बापाला शब्द दिलेला असतो.म्हणजेच विवाहसंस्थेवर पितृसत्ता कुटुंब पद्धतीचा प्रभाव पडलेला असल्याने कुटुंबातील मुलामुलींचे लग्न हे त्यांना न विचारता त्यांचे वडील परस्पर ठरवून टाकतात.

'सरप्राईज' या कथेतील सोफियाचे पिटरवर प्रेम असते. दोघांच्या वाड्.निश्चय (एंगेजमेंट) ठरते.तो तिला लग्नाचे आमिष दाखवून पुन्हा पुन्हा तिच्याशी शरीरसंबंध ठेवतो. तो लग्न करण्याचं टाळतो.ती पिटरच्या चुका त्याच्या लक्षात आणून देते की – "लग्नाचीच बंधनं श्रेष्ठ असतात आणि दोघांना बांधून ठेवायला पुरेसे असतात असं नाही म्हणणार मी. कारण लग्न झाल्यावरही फसवाफसवी करतातच माणसं आणि मनाचे बंध कच्चे असतात, असंही नाही. शेवटी ते व्यक्तिपरत्वे अवलंबून असतं." असे ती त्याला सांगते आणि सोडून देते. एकूणच विवाहपद्धती व परंपरा पुरुषापेक्षा स्त्रीबाबत फार नाजुक व स्फोटक असतात.

## निष्कर्ष

1. समाजाने स्त्री व पुरुष यांच्या संसारीक आणि काम जीवनाच्या बाबतीत विवाहसंस्था ही महत्वपूर्ण मानलेली आहे.
2. कुटुंबातील मुलांच्या लग्नाबाबत कुटुंबकर्ता पुरुष हा निर्णय घेत असतो. त्याच्या निर्णयाच्या विरोधात मुलीची आई किंवा मुलगी यांना जाता येत नाही असेही अनुभव विदर्भातील लेखिकांनी त्यांच्या कथांमधून मांडलेले आहे.
3. विवाह संस्थेवर समाजातील स्त्री पुरुष विषमतेचा जबरदस्त पगडा पडलेला दिसून येतो, त्या विषयीचे वस्तुनिष्ठ चित्रण या लेखिकांनी त्यांच्या कथांमधून केलेले आहे.
4. वैवाहिक रूढी परंपरा ह्या स्त्रीच्या विरोधात असल्याचे अनुभव या लेखिकांनी मांडलेले आहे.
5. विवाहाच्या वेळी मुलीला तिच्या आवडीनिवडीला प्राधान्य दिले जात नाही असेही अनुभव या लेखिकांच्या कथांमधून प्रकट झालेले आहेत.
6. मुलीचे शिक्षण किंवा करियर यापेक्षा घरातील मंडळी तिच्या लग्नावर जास्त भर देतात, असेही या लेखिकांच्या कथांमधून दिसून येते.

## संदर्भसूची

1. अय्यर सुप्रिया, चांदणचुरा, प्रथम आवृत्ती, नागपूर, साहित्य प्रसार केंद्र, २००५
2. आशिरगडे माधुरी : आई शपथ आणि इतर कथा,प्रथम आवृत्ती,नागपूर,आकांक्षा प्रकाशन,२०१३
3. कांबळे विशाखा संजय, गॅलक्झी, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, स्वच्छंद प्रकाशन, २०१३
4. कारखानीस मोहना संजय, जाईचा मांडव, प्रथमावृत्ती, नवघर, डिंपल पब्लिकेशन,२०१५,
5. मंडलेकर कुमुद, जाग, प्रथमावृत्ती, नागपूर, सुशील प्रकाशन, २००२
6. मंडलेकर कुमुद, देहकिनारा, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००४

7. मंडलेकर कुमुद, पडसाद, पहिली आवृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००४
8. मार्डीकर मोहना, तिचं आकाश, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २०१५
9. वानखेडे सुमती, जाणता अजाणता, प्रथम आवृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन, २००५
10. सबाने अरुणा, अनुबंध, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००५
11. साखरे सीमा, चार भिंतीच्या आत, प्रथमावृत्ती, नागपूर, सीमा प्रकाशन, २००७.
12. साधू मनिषा, डेल्टा, प्रथमावृत्ती, पुणे, संवेदना प्रकाशन, २००८